**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४७९/२०१९</u>**

**<u>निशाणी क्र. ४५ लगत</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एम.गायकवाड यांच्यामार्फत सुरु</u>**

माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. मी सध्या लोणंद येथील सस्ते हॉस्पीटल येथे परिचारीका म्हणून काम करते. माझा नर्सिंगचा कोर्स झाला आहे. मी सुमारे १० ते १५ वर्षापासून नोकरी करते. मला लिहिता वाचता येते. माझे २०११ साली लग्न झाले. २०११ साली शेती व शतीसंदर्भातील सर्व कामे हे माझे आईवडील करत होते. आता मला नि.४० वरील दस्तऐवज दाखविण्यात आले त्यावर कायम खुषखरेदीखत र.रु. १,३०,०००/– असे लिहिलेले आहे. सदरचे खरेदीखत हे दि.२३.०८.२००७ चे आहे. सदर दस्तावर लिहून घेणार म्हणून निलेश दशरथ गायकवाड प्रतिवादी यांचे नाव आहे. लिहून देणार म्हणून नंदा बबन अडसूळ माझी यांचे नाव आहे. सदर दस्तावर लिहून देणार म्हणून माझ्या आईची सही आहे. लिहून घेणार म्हणून प्रतिवादी यांची सही आहे. सदर दस्तावर साक्षीदार म्हणून दशरथ गुलाबराव गायकवाड व बबन गणपत अडसुळ यांची सही आहे. बबन अडसुळ हे माझे वडील आहेत. आता मला यादी नि.३ वरील दस्तऐवज क्र.३ दि.१७.०९.२००४ रोजीचे मुळ खरेदीखत दाखविण्यात आले. सदर खरेदीखत हे र.रु.१,१०,०००/– या किमतीचे आहे. सदर दस्तावर लिहून घेणार म्हणून प्रतिवादी यांचे नाव आहे. तसेच लिहून देणार म्हणून नंदा बबन अडसुळ माझी आई यांचे नाव आहे. सदर दस्तावर लिहून देणार म्हणून वादी व लिहून घेणार म्हणून प्रतिवादी यांची सही आहे. तसेच, साक्षीदार म्हणून बबन गणपत अडसुळ माझे वडील व दशरथ गुलाबराव गायकवाड यांची सही आहे. सदर दस्त हा मुळ दस्त असल्यामुळे त्यास **नि.४६** देण्यात येते. आता मला यादी नि.३ वरील दस्तऐवज क्र.४ दि.०३.०७.२००६ रोजीचा मुळ दस्त दाखविण्यात आला. सदरचा दस्त हा कायमखुष खरेदी खत दस्त असून ते र.रु.१,२५,०००/– या किमतीचे आहे. सदर दस्तावर वादी व प्रतिवादी यांच्या सह्या आहेत. सदर दस्त हा मुळ दस्त असल्यामुळे त्यास **नि.४७** देण्यात येते.

२. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीदस्त नि.४०, ४६ व ४७ या दस्तावर गहाणखताचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र.१ ते ३ मधील मजकुर हा मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दस्तऐवज नि.४० नुसार ताबा हा प्रतिवादी यांच्याकडे आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

SD/–

**फलटण**

(पी. एच. पाटील)

**दिनांक–** ०७.०४.२०२५

**४ थे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर फलटण**